**मराठी कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पडलेले प्रतिबिंब**

**डॉ.कल्याणी शेजवळ** अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्वरी ता.भिवंडी जि. ठाणे

---

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध आहे. साहित्यशिवाय समाज किंवा समाजाशिवाय साहित्याची निर्मिती होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे समाजामध्ये घडणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक…… इत्यादींसारखे जे बदल होतात, त्या बदलानुसार समाजामध्ये, साहित्यातील आशय आणि संदर्भ बदलतात किंवा प्रतिबिंबित होत असतात. साहित्य हा समाजामध्ये घडणाऱ्या बदलांचा आणि परिवर्तनांचा दस्तऐवज असतो. कादंबरी, कविता, कथा, नाटक ………इत्यादींसारखे वाड:मय प्रकार हे त्याची मांडणी आणि अभिव्यक्ती ही प्रतिमातून प्रतिबिंबित करत असतात. कविता वाड:मय प्रकार मानवी भावना आणि संवेदनातून मानवी जीवन-जाणिवा व्यक्त करणारा वाड:मय प्रकार आहे. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय अभिव्यक्त होणारा वांड:मय प्रकार. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सगळयाच जीवन जाणिवांचे, आंदोलनाचे, संघर्षाचे, कार्याचे, लेखन-ग्रंथाचे, मार्गदर्शक तत्त्वाचे, तत्त्वज्ञानाचे आणि विचारांचे चळवळींचे आणि त्यांनी केलेल्या कृती कार्यक्रमाचे, त्यामधून झालेल्या सर्व क्षेत्रातील सर्वांग बदलाचे प्रतिबिंब कवी कवितेतून प्रतिबिंबित करत आला आहे.

युगायुगातून एखादाच असा महामानव जन्माला येतो की ज्याच्यामहामानव जन्माला येतो की, ज्याचा बंद आणि पिळदार मुठित समग्र समाज परिवर्तनाच एक लालबुंद स्वप्न असतं. ते निखाऱ्यासारखं धगधगत असतं. मोठ्या पराक्रमाने तो आपली मूठ मोकळी करतो आणि जन्माला घालतो एक नवा माणूस. माणसाच्या शरीरभर पसरलेल्या साखळदंडावर तो प्रहार करतो. आपल्या वज्रमुठीने आणि भेदून टाकतो, माणसाभोवतालच्या अंधार आणि निर्माण करतो एक उजेडाचा गाव. या गावात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि आदि मूल्यांना मनसोक्त खेळण्यासाठी उपलब्ध करून देतो एक नव मैदान. या मैदानावर मूल्यांना वाचा फुटते, माणूस म्हणून त्याला चेहरा फुटतो ,आणि कोटी कोटी कुळांचा उद्धार होतो. पृथ्वीच्या पाठीवर असे मोजकेच महामानव येतात आणि उजळून टाकतात, इथला इतिहास, भूगोल, वर्तमान आणि भविष्य, अशाच एका महामानवाचं नाव आहे डॉ. भीमराव आंबेडकर. यांच्या जन्माला आज जवळजवळ १३२ वर्षे झाली आहेत. आजही त्यांच्या कर्तुत्वाच्या क्रांतिकारी मुद्रा जगभर टिकून आहेत. अगदी ताज्या, टवटवीत सामान्य माणूस या पाऊल मुद्रांपासून स्फूर्ती घेतो, नव्या श्वासाला आरंभ करतो. हिसाब किताब मांडतो. या पाऊल मुद्रा अधिक ठळक ठेवण्यासाठी त्यातील उजेड ऊर्जा घेण्यासाठी शब्दांपासून- कृतीपर्यंत, स्वप्नांपासून ते वास्तवापर्यंत गुलामीचा लांबलचक इतिहास पासून ते उजळून निघणाऱ्या वर्तमानापर्यंत वेगवेगळ्या पद्धतीचे उपक्रम राबवतो, विचार करतो, कृती करतो आणि आपल्याला लाभलेला ज्वलंत इतिहास विचार संघर्षाने परिवर्तित करतो. आजही बाबासाहेबांच्या विचारांचा जागर जगभर विविध चर्चासत्रे, परिषदे, कार्यशाळांमधून राबविला जात आहे .अगदी जगाची कचेरी असलेल्या युनो पासून ते महाराष्ट्रातील उजळून निघणाऱ्या राजवाड्यांपर्यंत, शासनापासून ते विद्यापीठांपर्यंत, विद्यापीठापासून महाविद्यालयापर्यंत, महाविद्यालयापासून गावच्या गल्लीपर्यंत, झोपड्यापासून वाड्या पाड्यापर्यंत ३६५ दिवस त्यांच्या कर्तुत्वाची विचारांचे पोवाडे गायले जात आहे. या पोवाड्यांमधून त्यांच्या विचारांची रुजवून होत असताना आपल्याला दिसत आहे.

बाबासाहेबांच्या विचारांचे प्राणवायू युद्ध वायू संघर्ष वायु पिऊन आता चौथी पाचवी पिढी वावरते आहे. मीही याच पिढीतला एक प्रतिनिधी. माझ्याही मागच्या पिढ्यांची जडणघडण बाबासाहेबांनी दिलेल्या शिदोरीवरच झाली आहे. आमच्या वाटचालीत आम्हाला रस्ता सांगणारे मैलाचे दगड आहेत ते. बाबासाहेबांनीच रौलेले आहे. आमच्या डोक्यावर बोधे वृक्षाची शितल छाया पसरली आहे ती बाबासाहेबांमुळेच. त्यांनी आमच्या अनेक पिढ्या काळजावर बुद्ध आणि धम्माच्या रूपात कोरलेल्या आहेत. त्याचा उजेड घेऊनच आम्ही प्रकाशमान होण्याचा प्रयत्न करत चाललो आहोत. आंबेडकरी विचार ज्या काळात रुजत होते, त्या काळात दलित समाजातील साक्षरतेचे प्रमाण अगदीच नगण्य होते. मुद्रीत माध्यमातून म्हणजेच अक्षर माध्यमातून ते मूक बनलेल्या समाजापर्यंत पोहोचणे कठीण होते, या विचारांची ऊर्जा घेऊन लाखो कोट्यावधी मुक्यांना कंठ फुटला आणि त्यांच्या ओठातून बलदंड क्रांतिकारक शब्द बाहेर पडले, आपण त्यांना आंबेडकरी शाहिरी जलसे म्हणतो. ही शाहिरी लोकगीते आणि त्यातही भीम गीते यांनी आंबेडकरी विचार पेटवण्यात खूप मोठी भूमिका बजावलेली आहे. आंबेडकरी जलसे आणि आंबेडकरी शायरी याचे बाबासाहेबांचे विचार रुजविण्याचे खूप मोठे योगदान या काव्य प्रकाराकडे जाते. साऱ्या चळवळी, सारे लढे, सारे संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या साऱ्या यशोगाथा त्यांनी पुढे आणल्या. मग कविता जन्माला येऊ लागली. या कवितांनी भीमराव कर्डक, वामनदादा कर्डक आधी दिगज्यांची परंपरा पुढे नेली. शिवाय अक्षरांची हत्यारे बनवून ती कवितेतून व्यक्त केली भीम विचारांचा खणखणात कवितेतून जसा आणि जेवढा ऐकू येतो तेवढा साहित्याच्या अन्य प्रकारातून ऐकू येणे थोडे कठीणच म्हणावे लागेल आंबेडकरी चळवळीत जे कार्यकर्ते लढत होते तेच कविता करत होते. त्यामुळे या चळवळीचे साहित्य ज्वलंत अधिक वास्तववादी अधिक अनुभववादी बनत गेली. कविता लिहिणारा जेव्हा राजकीय सामाजिक चळवळीमध्ये सहभागी होतो, तेव्हा समाज परिवर्तनाचा नव्हता तत्त्वज्ञान जन्माला येतो. प्रतिभा आणि वास्तवाच असे एकत्रित रूप जगाच्या इतिहासात तसं विरळच.

विद्रोही, परिवर्तनवादी, समतावादी, बंडखोर, दलित अशी नावे धारण करीत ही कविता आंबेडकरी जंक्शन कडे मध्ये पोहोचली आहे. ती जशी निळी झाली, तशीच ती धारदारही झाली. ती विद्रोही जशी झाली तशी, ती बुद्धाची करूना ही बनली. ती अंधार भेदणारी जशी झाली, तशी ती स्वयंप्रकाशित झाली. आंबेडकरी यूग म्हणजे एक अर्थाने समाज बदलासाठी झुंजत राहिलेला

आणि निळी काया घेऊन स्वतःचा अति असे वाढवणाऱ्या कवितांचेही हे यूग आहे .ती छंदात मुक्तछंदात अखंडात महाकाव्यतही उतरली. तिने आपल्याला पारंपारिक रूप कधी लागू दिले नाही. स्वतःला ब्युटी पार्लरमध्ये कधी नेलं नाही. तिचा साधेपणा, सच्चेपणा, रांगडेपणा, वास्तवाशी जोडून घेतलेली नाळ हेच तिचे सामर्थ्य ठरला आहे. ती इतरांपासून वेगळी आहे, कारण ती जातीपातीतून बाहेर पडून साऱ्या विश्वाचा मानवतेचा विचार करते, म्हणूनच ती वैश्विकही बनते. बाबासाहेबांच्या विचारांनी तिला वैश्विक बनवले एवढेच नव्हे तर तिचे लेखन करणाऱ्यालाही वैश्विक बनविले. आता आपणच एका अशा कालखंडात पोहोचलो आहोत की. या कवितेचा विचार केल्याशिवाय तिला तिची जागा आनंदाने दिल्याशिवाय मराठी साहित्याचे कॅलेंडर पूर्ण होऊ शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने ,त्यांच्या तत्त्वज्ञानाने, त्यांच्या कृती कार्यक्रमातून त्यांच्या संघर्षातून लढ्यातून, प्रेरणेतून दलित कविता पुढे जाताना दिसते. दलित कवितेच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने डॉ. बाबासाहेबांचे विचार केंद्रस्थानी आहे. आंबेडकरी विचार जाणिवांची ही कविता आहे. ती बाबासाहेबांनी प्रेरित केलेल्या मूल्यांमधून जगण्याचा आधार शोधत आत्मभान, आत्मविश्वास आणि आत्मवलंबनानी प्रेरित झालेली कविता आहे. ती बाबासाहेबांच्या विचारांच्या प्रेरणेतून प्रेरित झालेली त्यांच्या विचारांचे अनुकरण करणारी, आत्मशोधाची जाणीव घेऊन त्यांच्या विचारांचा अंमल करणारी आहेप्रसिद्ध कवी अजय कांडर कवितालेखन युगांव युगे तूच या कवितासंग्रहाबद्दल बाबासाहेबांविषयी मत मांडताना म्हणतात, मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांकडे कसा वळलो, हे सांगताना मला माझ्या 'युगानुयुगे तूच' या दीर्घ कवितेची निर्मितीप्रक्रिया इथे सांगावी लागेल. कोणत्याही कवितेची निर्मितीची प्रक्रिया हा खूप मोठा विषय आहे. केवळ माझ्यासाठीच नाही, तर एकूणच कविता लिहिणाऱ्यांत सगळयांसाठीच. याची कोणती कारणे असतील, असा विचार केल्यास प्रामुख्याने एक कारण आपल्याला सांगता येईल, ते म्हणजे कोणतीही कविता सुचली आणि लगेच लिहिली, असं जरी साधारण होत असलं तरी ती लिहिण्यामागची मानसिकता ही तुमच्या आधीच्या जगण्याशी निगडित असते. या लिहिण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक घटक येत असतात. या सगळया पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लिहिलेल्या 'युगानुयुगे तूच' कवितेचा आपल्याला सकारात्मक विचार करावा लागेल आणि हा विचार करत असताना त्याच्या मुळाशी जावं लागेल. हे मुळाशी जाणं म्हणजे नेमकी कोणती गोष्ट आहे? माझे कविमित्र कालकथित अरुण काळे म्हणतात, "कोणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहीत नाही." कवी काळे यांचं हे म्हणणं शंभर टक्के खरं आहे. अक्षर सुधारण्यासाठी कोणी कविता लिहित नाही, तर माणसं सुधारण्यासाठी, त्यांच्यातील संवाद वाढत जावा, माणसामाणसांतील भेद नष्ट व्हावा म्हणून कविता लिहायची असते. इथे कवीचे कवीची कविता लिहिण्या पाठीमागची भूमिका देखील डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची प्रतिबिंब करते कारण त्यांना देखील साहित्य हे मनोरंजनासाठी नसून ते समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी असावे, या विचारांशी प्रतिबिंबित होणारी आहे.

मराठी साहित्यात अनेक प्रवाह आहेत. त्यातील महत्त्वाचा प्रकार म्हणजे कविता. कवितेत जशी प्रतिभा असते तशीच बदलाची तीव्र भावनाही असते, विद्रोह असतो, विचार असतो. आंबेडकरी कवितेत बुद्धाची जशी सम्यक भावना आहे, तशीच आंबेडकरांनी पेरलेला विचारांची धक आणि कबीराची मानवताही आहे. या संदर्भात बाबुराव बागुल म्हणतात की, "मराठी साहित्यामध्ये १९६० च्या आसपास दलित साहित्य या नावाने धारदार साहित्य प्रवाह उद्या साला यामागे बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांचा पाय होता. चळवळीची सुत्री होती. समाजातील शोषित वर्गाला स्वतःचा चेहरा देण्याचे महत्त्वाचे काम आंबेडकरी चळवळीने केली. हा बाबासाहेबांचा विचार अतिविद्रोहाची हत्यारे घेऊन साठो तरी पिढीने समाजाला सर्व स्तरावरील शोषणाविरुद्ध दंड थोपटले. "१

"आंबेडकरी चळवळीत प्रत्येक शोषिताच्या मागे उभे राहण्याची जबाबदारी जाणीव होती, याच विचारांचे प्रतिबिंब त्या काळातील कवितेत उतरलेले दिसते. कवी नामदेव ढसांच्या शब्दात सांगायचं तर,

" रक्तात पेटलेल्या अगणितसूर्यनो
किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी
मरेपर्यंत राहायचं का असंच युद्ध केली"२ ( नामदेव ढसाळ- गोलपीठा )

समाजातील शोषित वर्गाला स्वतःचा चेहरा देण्याचे महत्त्वाचे काम आंबेडकरी चळवळीने केली. हा बाबासाहेबांचा विचार, अतिविद्रोहाची हत्यारे घेऊन साठोतरी पिढीने समाजाला सर्व स्तरावरील शोषणाविरुद्ध दंड थोपटले. कवयित्री प्रतिमा लांजेवार यांनी बाबासाहेबांविषयी ज्या सूर्य, चंद्राच्या प्रतिमांचे उपयोजन केलेले आहे, ते बाबासाहेबचे काळाबरोबर आणि काळासोबतच राहणारे प्रतिबिंब आहे.

"बाबासाहेब,
आमचय एकुलत्या एक आभाळाचा
तू चंद्र आहेस
ज्यांच्या आयुष्यालाच ग्रहण लागले
अशांचा तू सूर्य आहेत "

लोकप्रिय कवी नामदेव ढसाळ यांची कविता तर या व्यवस्थेवरती जळजळीत भाष्य करत बाबासाहेबांना या जगाचा उद्धारकरस्ता मानते.

"असाच तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी

जो शेतातून गर्दीतून मोर्चातून लढ्यातून आमच्याबरोबर असतो
नि आम्हाला शोषणातून सोडवतो तो तु तोच तु आमचा"

आंबेडकरांना गोलपिठा या काव्यसंग्रहात नामदेव ढसाळ आपल्या विकासाच्या समाजाच्या विकासाच्या रथाचा ते सारथी मानतात. दीपक ढोले यांच्या चेहेरे ओरबाडलेल्या देशात या कवितासंग्रहातील कविता मानवी वृत्ती प्रवृत्तींचे दर्शन घडवताना या समस्त मानवी जीवनात बाबासाहेबा जन्माला येणे किती महत्त्वाचे म्हणतात हे या कवितेतून अधोरेखित होतं.

"बाबासाहेब!.........
आलाच नसता तुम्ही
चेहरे ओरबडलेल्या देशात
तर........
आमचे जीवन आणखीही
माळावरच्या कुत्र्यागत झाले असते
तिरस्करणीय!

वर्णव्यवस्थेने निर्माण केलेली व्यवस्था आणि त्या व्यवस्थेला छेद देऊन सुरुंग लावण्याचे काम आंबेडकरांच्या कार्यातून आपल्याला दिसून आले. तरीही कवीने आपल्या कवितेतून ते अजरामर प्रतिबिंबित करण्याचे काम केले आहे. कारण हे वास्तव इतिहास कधीही नाकारू शकणार नाही.आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाद्वारे स्वतःला व स्वतःभोवतीच्या वास्तवला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.

आंबेडकरी साहित्याचा आधार, पाया आणि प्रेरणार बाबासाहेबाच आहेत. इथल्या सडक्या व्यवस्थेच्या नकारातून आंबेडकरी कविता उद्यास आलेली आहे. प्रखर सामाजिक भान आणि विचारांची पक्की बैठक यांच्या संयोगातून ती जन्माला आली आहे. 1956 नंतरच्या धम्मक्रांतीमुळे ती अधिक टोकदार बनली. वेदना आणि विद्रोहाच्या जोरावर मानवी समाज उभा करण्याचे ते सुंदर सम्यक स्वप्न होतं भीमराव कर्डक, वामनदादा कर्डक, व बाबुराव बागुल, नामदेव रसाळ, दया पवार, यशवंत मनावर, त्रंबक सपकाळे, राजा ढाले, वामन निंबाळकर, ज.वी पवार, यासारख्या अनेकांच्या कवितेतून आंबेडकरी कवितेचे धगधगत रूप जाणवतं. या कवितेत भेटणारा माणूस हा विकृत व्यवस्थेने केलेल्या शोषणाविरुद्ध अत्याचाराविरुद्ध आव्हान देताना दिसतो. ही कविता बाबासाहेबांसमोरं नतमस्त क होते. बुद्धांना फुलांच्या विचारांना आदर्श मानते या संदर्भात महेंद्र भवरे म्हणतात की, “भारतीय विचार परंपरेच्या संघर्षात समताधिष्ठित मूल्यांचा आग्रह धरणारी एक प्राचीन विचार परंपरा या देशात सतत संघर्ष राहिली आहे, तिचे आधुनिक रूप म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर"३.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा इतिहास आंबेडकरी कवितेने शब्दाबद्ध केला आहे. त्यांनी केलेल्या मानवमुक्तीच्या आंदोलनातून अस्पृश्य समाज ताठ मानेने उभा आहे. ही आंदोलने आंबेडकरी कवितेच्या केंद्रस्थानी येतात. काळाराम मंदिर, मनुस्मृति, चवदार तळे, पुणे करार, गांधी आयर्विन करार……….. इत्यादी कविता आणि बाबासाहेबांचे विचार यांचे एक अतूट नाते आहे .अण्णाभाऊ साठे हे नाते शब्दबद्ध करताना म्हणतात, जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भिमराव, परिवर्तन आणायचे असल्यास अनिष्ट परंपरांवर घाव घालायला हवा. प्रस्थापित व्यवस्थेतील शोषण संपून नव्या व्यवस्थेला जन्म घालायचा असेल तर, बुरसटलेल्या व्यवस्थेवर घाव घातलाच पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचा विचार अण्णाभाऊ समोर ठेवून कविता लिहितात. तेव्हा काळाची झुंज देणारा योद्धा आणि मानव मुक्तीच्याच पावलावर पाऊल ठेवून चालले पाहिजे, हेही सांगून जातात, आंबेडकरी चळवळीतून आलेले कवी यशवंत मनोहर यांसारखा प्रतिभा संपन्न कवी डॉ. बाबासाहेबांची असंख्य रुपे धारदार शब्दात, निळा आकाशात मानतो .भीम लिपी तयार करतो. भीमभारताकडे पाऊल टाकतो. त्याच्या कवितेतून डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचा डोंगरएवढ्या कार्याचे विविध पैलू समोर येतात. राज्यघटनेचा निर्माता मानव मुक्तीच्या लढ्याचा सेनानी आधी अनेक रूपे डॉ. मनोहर यांच्या भूमिकेतून कवितेतून मांडताना म्हणतात,

"तुम्ही विरुद्ध होतात शोषकांच्या
आणि त्यांनाच मिळणाऱ्या लिमिट लिमिटेड स्वातंत्र्याच्या
तुम्ही नातेबंदी करत होता
नाकापुढे चालणाऱ्या गरिबांवर
कोसळणाऱ्या पारतंत्र्याची तुम्हाला हवे होते सर्वांचे स्वातंत्र्य
प्रत्येकालाच समान सन्मान देणारे स्वातंत्र्य
**माणसाचे माणूसपण वैश्विक करणारे स्वातंत्र्य"**

मनोहर यांची कविता जशी तळागाळातल्या शोषिकांचा आवाज असलेल्या बाबासाहेबांविषयी बोलते, तशी ती जगातल्या तत्त्वज्ञानाशी आपली नाळ जोडू पाहणाऱ्या या नेत्यांच्या कर्तुत्वालाही सलाम करते. आंबेडकरी चळवळीत अनेक आघाड्यावर लढणारे राजा ढाले यांच्या कवितेची शैली सोपी आणि जय पद्धतीची आहे बाबासाहेबांचे व्यक्ती आणि कर्तृत्वाकडे आकृष्ट होतांना ते म्हणतात

"फुटात पावलांना वाटा तुझ्या दिशांच्या
ऐशी तुझ्याकडे या लाटा नव्या जगाच्या
मैत्री विना तुझ्या रे सरणार वैर नाही
सांगून भीम गेला कानात या जगाच्या"

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी समाजाची प्रत्येक वाट आंबेडकरी विचारांकडे जाते. आंबेडकरी साहित्यातील एक महत्त्वाचं नाव डॉ. मनोहर जाधव. ते आपल्या कवितेतून बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारताचे आजचे धगधगते वास्तव आपल्यासमोर मांडताना म्हणतात,

"हिंदू कोडबिलातून तू महिलांना आत्मसन्मान बहाल केल्यास
हे इथं स्त्री भ्रूणहत्यांचे डावपे चाखण्यात मजबूर"

आजच्या पिढीतील स्त्रीवादी कवित्री प्रज्ञा पवार बाबासाहेबांची तत्त्वज्ञान आणि आधुनिक श्रीवादाची सांगड घालण्याचा प्रयत्न करताना दिसतात. डॉ. संजय मून आपले मत व्यक्त करताना म्हणतात, "आत्मभानाची प्राप्ती आणि हात जागे झाल्याची जाणीव ही अभिव्यक्तीला वाट करून निर्माण देते. माणसाला नागवणारे, कायदे करणारे धर्मग्रंथ, संस्कृती, तिचा पाखंडीपणा या सर्वांचा विरोधात हा अविष्कार झाला आहे. शिवी देणेही अशिष्ट मानलेली बाब विद्रोहात्मतेमुळे संघर्षाच्या संदर्भात प्रतिष्ठेची ठरली आहे. नकार ही चिंतनशीलतेची एक बाजू असते, मात्र हीच चिंतनशीलता जेव्हा भावनेच्या तीव्रतेसह व्यक्त होते, तेव्हा त्या चिंतनशीलतेलाच विद्रोहाचे रूप प्राप्त होते. चिंतनशील भाषेचे संकेत धुडकावून ही चिंतनशीलता आवेगातील शब्द भाषेतून व्यक्त व्हायला लागते. अशाप्रकारे विद्रोहाची अभिव्यक्ती होते. "४

हे तूच दिलेस दृष्टे पण भीमा
की, आम्ही अजून घेतला नाही
एकही ग्रॅनाईट बॉम्ब हातात
हे तूच दिलेलं दृष्टे पण भीमा
की, आम्ही चिरायू ठेवले तुझं सार्वभौमत्व"

डॉ. बाबासाहेबांच्या सर्वसमावेशक तत्वाकडे आकर्षित होताना जाती-धर्माची बंधने गळून पडतात. ज्याच्याशी संवाद साधताना समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोनही व्यापक बनत जातो. बाबासाहेबांविषयी लिहिताना, मुस्लिम कवी सफरत अली इसब म्हणतात,

" तुझ्या विचारांची अनुकरण करताना लक्षात आले
धर्माची जखम एवढी चिघळली तरी
माणसाच्या रक्ताने पेटलेल्या पाऊलखुणा पुसद
आधी अफवांचे बाजार बंद करायला पाहिजेत
याच वेळी तू बहाल केलेले
संविधान आभाळाएवढे मोठे वाटत राहिले
आणि मग मीही आभाळाएवढा मोठा झालो"

जागतिकीकरणाच्या रीत्यात माणसाचं जीवन करपून जात आहे. सामाजिक बंध नात्यांचे संदर्भ बदलत चालले आहे। माणूस दिवसेंदिवस एकटा पडत चालला आहे. त्याच्या संवेदनाही बोथट होत आहेत. संवेदनाहीन बनत चाललेल्या या माणसाला माणूसपण शिकवायला ही बाबासाहेबांचे विचार उपयुक्त ठरतात. याच भावनेतून कवी अजय कांडर आजच्या युगातला कवी म्हणतात, ,

"जग बदललं
माणसं बदली
माणसाच्या वृत्ती प्रवृत्तीच्या आवर्तनात
माणूस एकटाच जगू लागला
तिथेही तूच मला सतत दिसत गेलास
सर्व अहंकार बाजूला सारून
माणसाने माणसासाठी जगावं
हा तुझा विचार रुजत राहिला
समूह सोडून जगणाऱ्या माणसांमध्ये ही"

अशोक बुरबुरे त्यांच्या "शब्द कधीच नसतात अर्थहीन" या कवितेमध्ये जागतिकीकरणात समाजसुधारकांच कशा पद्धतीने उदारीकरण आणि खाजगीकरण होत आहे . विचार करायला लावणारी कविता कवी बरोबरच वाचकाला देखील गंभीरतेकडे घेऊन जाताना दिसते घेऊन जाते ते म्हणतात,

"बुद्धाला ते संबोधतील विष्णू,
क्रांतीज्योती सावित्रीस नव्या युगातील सरस्वती,

आंबेडकरांना नव्या युगातील मनू! पुराणाला म्हणतील इतिहास,
आरत्याना ठरवतील महाकाव्ये! संगणकावर लिहीतील शेंदराने लाभ-शुभ'
माऊसला सिद्ध करतील गणाधिपतीचे वाहन
आणि संगणकाला चौसष्ट कलागुणांचा अधिष्ठाता!!
शेवटी ते म्हणतात या
'बहुजन' शब्दांमध्ये जात लपवता येते"

पण मी जातच मानत नाही! ही थाप खपवता येते!

जागतिकीकरणाच्या या युगात संवेदनाहीन झालेल्या व्यायामित्र व्यवस्थेचा बळी होत चाललेल्या माणसाचे जीवन परत मानवी मूल्याच्या तत्वत्रयीने, आंबेडकरांच्या तत्त्वाने पुन्हा उजळ करण्यासाठी

आंबेडकरांनी पुन्हा जन्माला येऊन या जगाचा उद्धार करावा अशी आशा बाळगतो, म्हणूनच डॉ. सुनील कुमार लवटे 'आरक्षण' या कवितेत म्हणतात,

" डॉ. आंबेडकर
परत एकदा या
सामाजिक न्यायाची नवी घटना लिहा
जमलं तर इथला प्रत्येक जीव
माणूस कसा होईल तेव्हा तेवढं मात्र बघा?

आंबेडकरी कवितांमध्ये मुक्त छंद ठळकपणे दिसतो. एवढेच नव्हे तर, वेगवेगळे भाषिक प्रयोग दिसतात. आशियाशी मात्र कसलीच तडजोड कवी करत नाही. 'अशोक इंगळे' यांची ‘तुझे बोट धरून चालताना' ही कविता जागतिकीकरणाला छेद देत संविधानाच्या उजेडाने भिजलेल्या वाती पेटविते.' जगदीश ओहोळ' हा नव्या दमाचा कवी आपल्या कवितेतून मनुवाद्यांना निर्वाणीचा इशारा देतो. तर 'रस्ता सोडून चालला कुठे? या कवितासंग्रहातून 'शेषराव धांडे' समकालीन प्रश्नावर भाष्य करत, मानवी मूल्याची प्रतिष्ठापना माणसाच्या उज्वल भविष्याची वाच्यता आणि इतिहासाची पुर्नमांडणी करतो. प्रमोद लांडगे सारखा कवी आंबेडकरांना 'योगनिर्मिक' ही प्रतिमा वापरतो. डॉ. दिलीप धोंडगे 'उंच झाड' अशी प्रतिमा वापरून बाबासाहेबांची समाजातील सगळ्यांना कवेत घेणारी वृत्ती अधोरेखित करतात.

सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील विषमता नष्ट करणे हा आंबेडकरी कवीचा उद्देश आहे. ज्या प्रकारचे जीवन समाजव्यवस्थेने शतकानुशतके लागले लादले आहेत, त्या जीवनातील अनुभव मनमोकळेपणे मांडण्याचा प्रयत्न प्रत्येक कवितेमध्ये आहे. समाजातील अन्याय- अत्याचाराचे दर्शन आंबेडकरी कविता घडविते. हे खरे आहे की, ती अपरिहार्यपणे एका समाज व्यवस्थेचे स्वप्न पाहते. आंबेडकरी कवितेचा जन्म जसा नव्या समाजासाठी आहे, तसा आपल्या वर्गाबाहेर पसरलेल्या उपेक्षित समाजासाठी आहे. अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसाचा जन्म हेच आंबेडकरी कवितेचे स्वप्न आहे. माणूस आणि कविता यांच्या अतूट नात्यातून जन्माला येणाऱ्या कविता लढाऊ असतात. या लढाऊ विचारांची प्रेरणा अर्थात डॉ. बाबासाहेब आहेत. त्या वास्तवावर भाष्य करून थांबत नाही तर, मैदानात लढण्यास उतरतात. त्यांच्या हालचालीतून लढण्याची, विचार करण्याची प्रश्न जन्माला घालण्याची प्रेरणा पाझरायला लागते, हे आंबेडकरी कवितेचे वैशिष्ट्ये आहे. सफल मानव मुक्तीसाठी आयुष्यभर जगडणाऱ्या महापुरुषांचा विचार, तत्त्वज्ञान, नैतिक मूल्य तसेच राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तमान व्यवस्थेतील व्यक्तिगत लोभापायी उत्तरोत्तर होत जाणारी पीछेहाट पाहताना दशकातील अस्वस्थ पिढीची होणारी घुसमट शब्दबद्ध करणे आंबेडकरी कवितेचे मध्यवर्ती सूत्र आहे, म्हणूनच ही उजेडाची कविता आहे. या कवितेचा उजेड म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे. की, जो दीपस्तंभासारखा कायमच कवितेत प्रतिबिंबित होताना नव्या समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहे.

संदर्भसूची:

१. बाबुराव बागुल- दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान, बुद्धिस्ट पब्लिकेशन हाऊस, नागपूर १९८२ पृ. ८९
२. यशवंत मनोहर - मराठी कविता आणि आधुनिकता, आंबेडकर धम्म प्रकाशन नागपूर १९९८ पृ.१२१
३. महेंद्र भवरे- मराठी कवितेच्या नव्या दिशा, प्रकाशक फोक्लोअर हाऊस, मुंबई पृ. १३५
४.यशवंत मनोहर- आंबेडकरवादी मराठी साहित्य भिमरत्न प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती -१९९९ मुंबई पृ. २५